**सुमित्रा आत्माराम जाधव वि.**

**पांडुरंग बुधाजी जाधव**

**निशाणी क्रमांक २४ वरील आदेश**

१. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी मयत वादी क्र.१ यांचे वारसांना वादी म्हणून सामील करून घेणेची परवानगी मागितलेली आहे.

२. अर्जदारच्या मते, सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील वादी क्र.१ सुमित्रा आत्माराम जाधव ही दिनांक ११/१२/२०२१ रोजी मयत झाली आहे. वादी क्र.१ हीला सौ. अंजली अर्जुन जाधव पूर्वाश्रमीची साधना आत्माराम जाधव (मुलगी), सौ. अलका यशंवत साजणेकर पुर्वाश्रमीची अलका आत्माराम जाधव (मुलगी), सौ. सांची सखाराम जाधव पुर्वाश्रमीची अर्चना आत्माराम जाधव (मुलगी), सौ. आशा अतुल कर्डक पुर्वाश्रमीची आशा आत्माराम जाधव (मुलगी) हेच नजीकचे व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याकामी वादी क्र.१ हीचे वारस म्हणून सामील करुन तशी दुरुस्ती करणेची परवानगी अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे. तसेच प्रस्तुत अर्जामध्ये वारसांपैकी अ.क्र. १ , ३ व ४ हे बाहेरगावी असल्याने प्रस्तुत कामामध्ये हजर होवू शकत नसल्याने त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करण्याची विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज मुदतीत नसलेने नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. अर्जदार व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द कायमची ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदारने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच

अर्जदारने नि.२७ सोबत वादी क्र.१ सुमित्रा आत्माराम जाधव यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. प्रस्तुत कामी अर्जाचे स्वरुप पाहता मयत वादीचे वारस अभिलेखावर आणण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु अर्जदार यांनी पुढे केलेली मागणी म्हणजेच अर्जदार क्र.१, ३ व ४ यांना प्रतिवादी म्हणून सामील करणेबाबतचा मजकूर पाहता सदरची विनंती ही प्रस्तुत अर्जाद्वारे मान्य करता येणारी नाही. अर्जदार यांना अभिलेखावर दाखल झाल्यानंतर वादी पक्षातून प्रतिवादी पक्षामध्ये स्थलांतर करता येणारे आहे. त्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील कायद्यांतर्गत तरतुदी नमुद आहे. परंतु प्रस्तुत अर्जाद्वारे सदरची मागणी अर्जदार यांना अभिलेखावर येण्याआधी करता येणारी नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज आहे या स्वरुपामध्ये पूर्णतः मंजूर करता येणार नाही. करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करणेत येत आहे.

२. अर्जदार यांना दाव्याच्या सरनाम्यामध्ये मयत वादीचे वारस म्हणून सामील करणेची परवानगी देणेत येत आहे.

३. अर्जदार यांनी सदर आदेशाप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेची आहे व दाव्याची दुरूस्त प्रत पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक- २०/०२/२०२४ (श्रीमती आर.जी.कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),

सावंतवाडी.

## Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | U. B. Hundekar (Grade-3) |
| Court | :- | Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Sawantwadi |
| Date | :- | 20/02/2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 22/02/2024 |
| Judgment/Order uploaded on | :- | 22/02/2024 |